Reading Paragraph-(Any one)

सर्व प्राण्यांमध्ये आपल्या अगडबंब शरीराने आणि वेगळ्या शारिरीक वैशिष्टयाने लक्ष वेधून घेणारा प्राणी म्हणजे गजराज किंवा हत्ती होय. हत्तीचा रंग काळा, किंचित गडद लालसरपणाची झाक असलेला किंवा करडा असतो. त्याचे वजन दोन टनापासून सुमारे चार/पाच टनापर्यंत असू शकते. त्याला खांबासारखे चार पाय असतात. सुपासारखे मागे पुढे हलणारे दोन मोठे कान असतात. नाकाच्या जागी लांब सोंड असते. तोंडात दोन मोठे सुळे दात बाहेर लांबपर्यंत वाढलेले असतात. शेपटी लहान व तिला केसाचा छोटा गोंडा असतो. शरिराच्या मानाने त्याचे दोन डोळे फारच लहान असतात. हत्ती हा पूर्ण शाकाहारी प्राणी आहे. गवत, झाडाचा पाला, ऊस, फळे, ही त्याची आवडती \खाद्ये. गवताळ प्रदेश, हिरवी झाडी असलेला भाग, पाण्याची सोय असलेला प्रदेश येथे हत्तीचे वास्तव्य असते. हत्ती कळप करुन राहतात. अन्नासाठी स्थलांतर करतात.

हत्ती हा हुशार, बुद्धिमान प्राणी आहे. सगळ्या घटना, गोष्टी त्याच्या स्मरणात राहतात. हत्ती माणसाळतो. माणूस शिकवेल तसा वागतो. कष्टाची कामे करतो. पाण्यात खेळायला त्याला फार आवडते. हत्तीच्या मादीला एकावेळी एक पिलू होते. पिलाचा सांभाळ सर्व कळप करतो. त्याची चाल धीमी असते. तिला गजगती म्हणतात. सोंड व सुळे दात हे हत्तीचे वेगळेपण होय. सोंडेच्या सहाय्याने तो सर्व कामे करतो. हत्तीला वैभवाची निशाणी मानतात. मदत करणाऱ्यावर हत्ती प्रेम करतो. असा हा हत्ती मुलांना फार आवडतो.

१. वरील उताऱ्यात हत्तीचे वजन किती असते?
२. हत्ती शाकाहारी आहे हे तुम्हाला कसे कळले?
३. हत्तीच्या चालण्याला काय म्हणतात?
४. हत्तीला अन्नासाठी स्थलांतर ( माइग्रेशन) का करावे लागत असेल?
५. इतर प्राण्यांच्या तुलनेत हत्ती कोणत्या कारणाने वेगळा आहे?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America..

Reading Paragraph

एका गावात दोन मित्र रहात होते. शिवा आणि भिवा. शिवा आंधळा होता आणि भिवा लंगडा होता. त्यांची मैत्री मात्र खुप घट्ट होती. दोघांना घरात ठेवून त्यांचे आईवडिल आपल्या कामाला जात असत. तोपर्यंत ही दोघे एकमेकांची खुप काळजी घेत. एकेदिवशी त्यांना घराबाहेर लोकांचा गोंधळ ऐकु आला. लोक मोठमोठ्याने आग -आग , पळा- पळा अशी ओरडत होती. मुले घाबरली. एकमेकांचा हात घट्ट धरून घराबाहेर आली. बघतात तर काय आग अगदी त्यांच्या घरापर्यंत आली होती.

भिवा हुशार होता. त्याने लगेच शिवाला सांगितले. तू मला पाठीवर घे आणि धावायला सुरवात कर. मी तुला रस्ता सांगतो. शिवाने क्षणाचाही वेळ न घालवता जसे भिवा म्हणाला तसे केले. त्यामुळे दोघांचेही प्राण वाचले. गावात त्यांच्या मैत्रीचे आणि कृतीचे खुप कौतुक झाले. संध्याकाळी दोघांच्या आईवडिलांनी आपली मुले सुखरूप असल्याचे पाहून आणि त्यांनी केलेल्या कृतिचे वर्णन ऐकून त्यांचे डोळे पाणावले.

प्र १. वरील उताऱ्यातील मित्रांची काय नावे होती?
प्र २. एक दिवस बाहेर कश्याचा गोंधळ त्यांनी ऐकला?
प्र ३. भिवाने काय केले ?
प्र ४. दोघांचे जीव कसे वाचले?
प्र ५. दोघांना नक्की काय झाले होते म्हणून त्यांना एकमेकांची मदत घ्यावी लागली?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America..

Listening paragraph- (Any one)

ही  एक खरी घटना आहे. काही वर्षांपूर्वीची ही गोष्ट. एक अकरा वर्षांचा मुलगा होता. तो खूप हुशार होता. शिक्षक, आईवडिलांचे तो नेहमी ऐकायचा. लोकही त्याचे खूप कौतुक करायचे. एक दिवस त्याने आपल्या वडिलांना रु. १०/- मागितले. वडिलांना खूप आश्चर्य वाटले कि हा कधीच पैसे मागत नाही मग आज का?त्याला काही वस्तू हवी असेल तर तो ती बाबांनाच मागायचा. वडिलांनी त्याला विचारले सुद्धा पण तो उत्तर ना देता पैसे घेऊन निघून गेला. मग बाबानी त्याचा पाठलाग केला.

मुलगा सरळ आपल्या मित्राकडे गेला, त्याला बरोबर घेऊन पुस्तकांच्या दुकानात गेला. मित्राला हवी असलेली पुस्तके त्याने विकत घेतली आणि मित्राला दिली. त्याचे बाबा दुरून हे बघत होते. त्यांना खूप आनंद झाला. ते मुलाजवळ गेले आणि म्हणाले,' मला तुझा खूप अभिमान वाटतो. तू आपल्या मित्राची खरी मदत केलीस."

तो मुलगा चित्तरंजनदास होता. मोठा झाल्यावर त्याने देशसेवा केली. लोक त्याला "देशबंधु चित्तरंजनदास" म्हणू लागले.

प्र १. वरील उताऱ्यात ह्या मुलाचे वय काय होते?
प्र २. तो मुलगा कसा होता?
प्र ३. मित्राला घेऊन तो कुठे गेला?
प्र ४. बाबांना मुलाचा अभिमान का वाटला?
प्र ५. ह्या मुलाचे नाव काय होते?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America..

Listening paragraph

देहलीमध्ये एका मंदिरात संत नामदेव महाराजांचे कीर्तन चालू होते. खुद्द बादशहाच्या कानावर त्यांची कीर्ती गेली. तेव्हा नामदेवांचे कीर्तन एकदा ऐकून त्यांच्या संतपदाची प्रचीती पाहण्याचा विचार बादशहाच्या मनात आला. एक दिवस नामदेवांचे कीर्तन चालू असता बादशहा तेथे आला आणि त्याने एक गाय आणून तिला तेथे मारून  टाकले. नंतर त्याने नामदेव महाराजांना सांगितले, ‘जर ही मेलेली गाय जिंवत करून उठवशील, तरच तू खरा साधू, नाहीतर तुझा डोके उडवीन. किती दिवसांत गाय जिवंत करशील ?’ असे नामदेवांना विचारल्यावर त्यांनी सांगितले, “चार दिवसांत उठवीन”. ते ऐकून बादशहा निघून गेला. हे संकट पाहून नामदेवास फार चिंता वाटू लागली. त्याने पांडुरंगाचा धावा केला. तीन दिवस सारखे कीर्तन करून ‘पांडुरंगा, आता माझा अंत पाहू नकोस. लवकर धाव”, अशी प्रार्थना केली.

चौथ्या दिवशी देवाने नामदेवाच्या अंतःकरणात प्रगट होऊन लगेच ती गाय उठवली आणि नामदेवास म्हटले, ‘सावध हो आणि डोळे उघडून पहा’. तेव्हा नामदेव म्हणाला, ‘देवा, चार दिवसांपर्यंत तू माझा अंत का पाहिलास ?’ तेव्हा विठोबा म्हणाला, ‘नाम्या, आताच गाय उठवतो, असे तू म्हणाला असतास, तर मी त्याच वेळी येऊन ती गाय उठविली असती; परंतु तू चार दिवसांची मुदत घेतलीस; म्हणून मला थांबणे भाग पडले. मी तुम्हा भक्तांच्या अधीन आहे. जसे तुम्ही बोलाल, तसे मी त्याच वेळी केल्यावाचून रहाणार नाही’. गाय जिवंत झाल्याची पाहताच बादशहाचा अहंकार गळून पडला आणि तो नामदेवास शरण गेला.


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America..

१. बादशहाला नामदेवांची कशाची प्रचिती पाहायची होती?

२. बादशहाने यासाठ काय केले?

३.नामदेवांनी किती दिवसांची मुदत मागतली?

४. गाय कधी जिवंत झाली?

५. देवाने गाय पहिल्या दिवशी का जिवंत केली नाही?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America..